# पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम

काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.
कार्यालय दूरध्वनी क्र. – ०७२५२-२३४८२४
ई-मेल :- sp.washim@mahapolice.gov.in
वेबसाईट :- www.washimpolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

**• प्रेस नोट •** दि.०४.०२.२०२२

## महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल महामहीम श्री.भगतसिंह कोश्यारी यांच्या वाशिम जिल्हा दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्हा पोलीस दल सज्ज.

महाराष्ट्र राज्याचे मा.राज्यपाल महामहीम श्री.भगतसिंह कोश्यारी यांचा वाशिम जिल्हा दौरा कार्यक्रम नियोजित असून उद्या दि.०५.०२.२०२२ रोजी मा.राज्यपाल महामहीम श्री.भगतसिंह कोश्यारी हे वाशिम जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून ते शिरपूर येथील जैन मंदिर व कारंजा येथील गुरु मंदिर येथे भेट देणार आहेत. त्यानुषंगाने वाशिम जिल्हा पोलीस दल सुसज्ज झाले असून सुरक्षेच्या दृष्टीकोनातून कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

सदर दौरा बंदोबस्ताकरिता वाशिम पोलीस दलामार्फत ५५ अधिकारी व ६०० पोलीस अंमलदार ज्यामध्ये पोलीस स्टेशनचे अधिकारी अंमलदार तसेच ०२ दंगा नियंत्रण पथक (RCP), ०२ स्ट्रायकिंग फोर्स, बॉम्ब शोधक व नाशक पथक (BDDS)चे वाशिम व अकोला पथक, नांदेड येथील स्पेशल प्रोटेक्शन युनिटचे १० अधिकारी व अंमलदार यांचा समावेश आहे. या बंदोबस्तावर पर्यवेक्षण व नियंत्रण करण्यासाठी ०१ पोलीस अधिक्षक, ०१ अपर पोलीस अधिक्षक व ०५ उपविभागीय पोलीस अधिकारी तैनात आहेत. त्यापैकी ०२ उपविभागीय पोलीस अधिकारी हे यवतमाळ व अमरावती ग्रामीण येथून बंदोबस्ताकरिता हजर आहेत.

काल दि.०३.०२.२०२२ रोजी सदर दौरा संदर्भाने सुरक्षेच्या दृष्टीकोनातून अपर पोलीस अधिक्षक श्री.गोरख भामरे यांनी स्वतः बंदोबस्ताच्या ठिकाणी भेटी देत सुरक्षा तपासणी केली. आज दि.०४.०२.२०२२ रोजी पोलीस अधिक्षक श्री.बच्चन सिंह (IPS) यांनीसुद्धा कारंजा व शिरपूर येथे भेट देत संपूर्ण दौरा मार्गाची पाहणी केली. यावेळी पोलीस अधिक्षक श्री.बच्चन सिंह (IPS) यांनी स्वतः कारंजा येथील गुरुमंदिर व शिरपूर येथील जैन मंदिर येथे बंदोबस्ताच्या ठिकाणी सुरक्षा तपासणीचा आढावा घेतला व सुरक्षेच्या दृष्टीने सतर्कता बाळगत कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाही याकडे लक्ष देण्याबाबत कडक निर्देश दिले. सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी बंदोबस्तातील अधिकारी व अंमलदार यांना दौऱ्यासंदर्भाने ब्रीफिंग केले व सुरक्षा व्यवस्था व कोविड - १९ अनुषंगाने दक्षता बाळगण्याच्या सूचना देण्यात आल्या.

Dhumal 04/02

(प्रवीण धुमाळ)
पो.नि., जिल्हा विशेष शाखा,
वाशिम.